ePaper
**अमेरिका-इराण चर्चेचा पेच सुटेना! इराणचे परराष्ट्र मंत्री अराघची पुन्हा इस्लामाबादमध्ये**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™




६० कोटी घोटाळ्या प्रवीण जैन यांचा खळबळ जनक दावा

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 27 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## वॉशिंग्टन येथील कार्यक्रमात झालेल्या गोळीबारानंतर ट्रम्प यांची माहिती

# हल्ल्याची आधीच कल्पना होती?

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे उपस्थित असलेल्या हॉलच्या बाहेर गोळीबार झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. व्हाईट हाऊस करस्पाँडंट्स असोसिएशनच्या डिनरदरम्यान झालेल्या या घटनेमुळे पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. गोळीबारास सुरूवात होताच उपस्थितांनी जीव वाचवण्यासाठी टेबलांखाली आश्रय घेतला, तर 'सिक्रेट सर्व्हिस'च्या जवानांनी ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवले.**



व्हाईट हाऊस करस्पाँडंट्स डिनरदरम्यान झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अनेक महत्त्वाचे मुद्दे समोर आले. या घटनेमुळे अमेरिकेच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, अशा उच्चस्तरीय कार्यक्रमांमध्ये सुरक्षा किती महत्त्वाची आहे याची जाणीव पुन्हा झाली आहे.

पत्रकार परिषदेत सीएनएन च्या पत्रकाराने ट्रम्प यांना थेट प्रश्न विचारला की, या हल्ल्याबाबत त्यांना किंवा त्यांच्या टीमला आधीपासून कोणतीही धोक्याची सूचना मिळाली होती का? या प्रश्नावर ट्रम्प यांनी स्पष्ट शब्दांत उत्तर देत सांगितले की, "नाही, आम्हाला याबद्दल काहीही कल्पना नव्हती आणि कोणतीही सूचना देण्यात आलेली नव्हती." त्यांच्या या वक्तव्यानंतर सुरक्षा यंत्रणांच्या तयारीवर चर्चा सुरू झाली आहे.

यानंतर पत्रकारांनी ट्रम्प यांना विचारले की, या गोळीबाराच्या घटनेत ते स्वतः लक्ष्य होते का? यावर उत्तर देताना ट्रम्प म्हणाले की, "मला तसे वाटते. हे लोक वेडे आहेत, आणि काही सांगता येत नाही. हल्लेखोर माझ्यापासून खूप दूर होता आणि त्याला अनेक अडथळे पार करावे लागले असते." त्यांनी पुढे सांगितले की, कार्यक्रमादरम्यान सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सक्रिय होती आणि अनेक एजंट्स वेशांतर करून पाहुण्यांमध्ये उपस्थित होते.

हा कार्यक्रम व्हाईट हाऊस करस्पाँडंट्स डिनर म्हणून ओळखला जातो आणि अमेरिकेतील अत्यंत प्रतिष्ठित कार्यक्रमांपैकी एक मानला जातो. देशातील नामांकित पत्रकार, राजकारणी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित असतात. त्यामुळे या ठिकाणी झालेला गोळीबार हा अत्यंत गंभीर प्रकार मानला जात आहे.

गोळीबार झाल्यानंतर तात्काळ कारवाई करत सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि फर्स्ट लेडी मेलानिया ट्रम्प यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. ही कारवाई अत्यंत वेगाने करण्यात आली, ज्यामुळे कोणताही मोठा अनर्थ टळला. सुरक्षा यंत्रणांच्या तत्परतेचे यासाठी कौतुक केले जात आहे.

हल्लेखोराची ओळख कॅलिफोर्नियातील ३१ वर्षीय कोल टॉमस ॲलन अशी पटली आहे. तो ज्या हॉटेलमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या वॉशिंग्टन हिल्टन हॉटेल मध्येच राहत होता, ही बाब अधिक चिंताजनक मानली जात आहे. यामुळे सुरक्षा तपासणी प्रक्रियेत काही त्रुटी राहिल्या का, याचा तपास सध्या सुरू आहे. घटनेदरम्यान हल्लेखोराने सुरक्षा बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न केला होता. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये हा प्रकार स्पष्टपणे दिसतो. त्या व्हिडिओमध्ये युनायटेड स्टेट्स सिक्रेट सर्व्हिस चे एजंट त्याला ताब्यात घेतात. या एजंट्सच्या वेगवान आणि प्रभावी प्रतिसादामुळे मोठा धोका टळला.

### ट्रम्प यांची पत्रकार परिषद

गोळीबाराच्या घटनेनंतर अवघ्या दोन तासांत ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेतली आणि संपूर्ण घटनेबद्दल माहिती दिली. त्यांच्या या जलद प्रतिसादामुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यास मदत झाली. त्यांनी लोकांना आश्वस्त करत सांगितले की, अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. या संपूर्ण घटनेनंतर अमेरिकेतील सुरक्षा यंत्रणांवर अधिक जबाबदारी येणार आहे. विशेषतः उच्चस्तरीय कार्यक्रमांमध्ये सुरक्षा अधिक कडक करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच, अशा प्रकारच्या घटनांना रोखण्यासाठी गुप्तचर यंत्रणांची कार्यक्षमता वाढवणेही अत्यावश्यक ठरणार आहे. एकूणच, या घटनेमुळे अमेरिकेतील सुरक्षा व्यवस्थेच्या पद्धतींवर पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे आणि सुरक्षा यंत्रणांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

# महाबळेश्वर येथे अत्याधुनिक रडार कार्यान्वित

## पुणे, मुंबईच्या तातडीच्या हवामान अंदाज क्षमतेमध्ये आता वाढ होणार

**महाईन्यूज । पुणे**

**भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेतर्फे (आयआयटीएम) 'मिशन मौसम'अंतर्गत महाबळेश्वर येथील 'हाय अल्टिट्यूड क्लाउड फिजिक्स लॅबोरेटरी' मध्ये अत्याधुनिक 'एक्स बँड ड्युअल-पोलरायझेशन डॉप्लर वेदर रडार' बसवण्यात आला आहे. ही रडार प्रणाली आकाशातील एका 'हवामान डोळ्या'प्रमाणे काम करून पाऊस, ढग, वादळ प्रणालींचा तत्काळ (रिअल-टाइम) मागोवा घेण्यासाठी वातावरणाचे सतत स्कॅनिंग करणार असून, या प्रणालीमुळे पुण्यासह सातारा, कोकण मुंबईच्या काही भागांसाठी 'नाऊकास्टिंग' (तातडीचा अंदाज) क्षमता आता तीन तासांपर्यंत वाढू शकणार आहे.**



पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन यांच्या हस्ते या रडारचे उद्घाटन करण्यात आले. आयआयटीएमचे संचालक ए. सूर्यचंद्र राव, 'सॅक-इस्रो'चे संचालक सौम्य एस. सरकार या वेळी उपस्थित होते. पश्चिम घाटात समुद्रसपाटीपासून सुमारे १४०० मीटर उंचीवर ही रडार प्रणाली बसवण्यात आली आहे. वेगाने हवामान बदलणाऱ्या, मोठ्या प्रमाणात पाऊस, धुके पडणाऱ्या, वेगवान वारे वाहणाऱ्या महाबळेश्वरसारख्या भागातील स्थानिक हवामान स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी ही रडार प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावेल. दुर्गम आणि जटील भूप्रदेशावरील पर्वतीय पावसाची गतिशीलता आणि खोलवर चालणाऱ्या संवहनी प्रक्रियांचा अभ्यास करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

आकाशातील एका 'हवामान डोळ्या'प्रमाणे ही रडार प्रणाली काम करून पाऊस, ढग आणि वादळ प्रणालींचा तत्काळ (रिअल-टाइम) मागोवा घेण्यासाठी वातावरणाचे सतत स्कॅनिंग करणार आहे. त्यामुळे सातारा, पुणे, कोकण, मुंबईच्या काही भागांसाठी 'नाऊकास्टिंग'ची (तातडीचा अंदाज) क्षमता तीन तासांपर्यंत वाढवते. ९.४५ गिगाहर्ट्झवर 'सॉलिड-स्टेट पॉवर ॲम्प्लिफायर' तंत्रज्ञानासह कार्यरत असलेली ही रडार प्रणाली उच्च विश्वासार्ह, कमी देखभाल लागणारी आणि ऊर्जा कार्यक्षम आहे. याची 'ड्युअल-पोलरायझेशन' क्षमता ढगांच्या सूक्ष्म भौतिकशास्त्राबद्दल सखोल माहिती उपलब्ध करू शकणार आहे. त्यात पावसाची वैशिष्ट्ये, पावसाच्या थेंबांच्या आकाराचे वितरण आणि वादळाची रचना यांचा समावेश होतो. उच्च अवकाशीय रिझोल्यूशन आणि जलद माहिती देण्याच्या क्षमतेमुळे पावसाच्या प्रमाणाचा अंदाज आणि वर्गीकरण सुधारण्यास मदत होऊ शकणार असल्याची माहिती आयआयटीएमने दिली.

महाबळेश्वर येथील रडार प्रणाली पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आणि पर्यटनासाठी महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये पूर्वसूचना व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने एक मोठी प्रगती आहे. तीव्र हवामान स्थितीसाठी वेळेवर इशारा देणे, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांची सुरक्षा वाढवणे या दृष्टीने महत्त्वाचे आहे, असे रविचंद्रन यांनी सांगितले. रडार प्रणालीमुळे नाऊकास्टिंग क्षमतेत लक्षणीय वाढ होऊ शकणार आहे. तसेच हवामान अंदाज, हवामान प्रारुपांमध्ये सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे, असे डॉ. सूर्यचंद्र राव यांनी नमूद केले. उपग्रह आणि जमिनीवरील निरीक्षणांचे एकत्रीकरण करणे, वातावरणीय आणि धुलिकण विदाचे प्रमाणीकरण सुधारणे, अंदाजाची अचूकता वाढवणे, खोल संवहन, वीज पडणे, हवामान बदलाचे परिणाम अशा क्षेत्रातील संशोधन, उपग्रह हवामानशास्त्रातील क्षमता विकास आणि प्रशिक्षणाचे काम या या कराराअंतर्गत केले जाणार आहे.

### रडार प्रणालीचे महत्त्व

महाबळेश्वर येथे बसवण्यात आलेली रडार प्रणाली पावसाची प्रक्रिया, वादळाची रचना आणि अत्यंत तीव्र हवामान घटनांचे सखोल संशोधन करण्यासाठी महत्वाचे ठरणार आहे. पूर आणि भूस्खलनासाठी पूर्वसूचना प्रणाली, विमान वाहतूक सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, कृषी सल्लागार आणि जलसंपदा नियोजनासाठीही उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे या भागातील परिणाम आधारित हवामान अंदाज, हवामान लवचिकता अधिक मजबूत होऊ शकणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# पारा वाढल्याने पुणेकर उष्णतेमुळे हैराण, शहर बनलेय 'हॉट स्टेशन'!

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील तापमान रविवारी (दि.२६) चाळिशी पार करून ४१.८ अंशावर गेले. त्यामुळे पुणेकरांच्या अंगाची लाहीलाही झाली. घरात आणि घराबाहेर पडल्यावर अंगाला उष्ण झळा झोंबत होत्या. रस्त्यावरील डांबर देखील काही भागात वितळले होते. यावरून तापमानाचा पारा चांगलाच वाढल्याचे दिसून आले. कधी काळी 'हिल स्टेशन' असलेले पुणे आता 'हॉट स्टेशन' बनले आहे.**




गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरातील कमाल तापमानाचा पारा चांगलाच वाढू लागला आहे. कधी नव्हे ते शहरातील तापमान चाळिशी पार जात आहे. अन्यथा यापूर्वी हा पारा चाळिशीच्या आत नोंदवला जात होता. परंतु, गेल्या एक-दोन वर्षांमध्ये प्रचंड प्रमाणात बांधकामे झाली, एसी आणि वाहनांची संख्या वाढली आहे. परिणामी शहरातील तापमान वाढताना दिसून येत आहे. राज्यभरात देखील तापमानाचा पारा ४५ अंशापर्यंत पोचत आहे.

रविवारी (दि.२६) शहराला उन्हाचा तडाखा बसला असून, तो अधिक तीव्र होत आहे. उष्णतेचा पारा ४१.८ अंश सेल्सिअसवर गेल्याने पुणेकरांना उन्हाच्या झळांनी नकोसे केले. शिवाजीनगरचे कमाल तापमान ४१.८ अंश नोंदवले गेले. तसेच इतर भागातील आणि जिल्ह्यातील काही गावातही हा पारा ४१ अंशावर गेला. रविवारी तर सकाळी १० वाजल्यापासूनच सूर्याचे चटके जाणवू लागले, तर दुपारच्या वेळी उन्हाच्या झळांनी अंगाची लाहीलाही झाली. रस्त्यांवरून चालताना उष्ण वारे थेट शरीराला लागत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले.

दरम्यान, शिवाजीनगरच नव्हे, तर पाषाण, चिंचवड, कोरेगाव पार्क, हडपसर आणि मगरपट्टा या भागांतही कमाल तापमानात वाढ नोंदवली आहे. वाढत्या तापमानासोबतच उकाडाही कमालीचा वाढला असून, पुणेकर घामाघूम झाले आहेत. परिणामी रविवार असूनही दुपारच्या सत्रात शहरातील मुख्य रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला.

### किमान तापमानतही वाढ

शहरातील कमाल तापमान ४२ अंशापर्यंत जात असून, किमान तापमानातही वाढ झाली आहे. हडपसरमध्ये किमान तापमान २८, तर मगरपट्टा, वडगावशेरी २७ अंशावर पोचले आहे. त्यामुळे रात्री देखील प्रचंड उष्णता जाणवत आहे. ज्या भागात प्रचंड बांधकामे सुरू आहेत, त्याच भागात किमान व कमाल तापमान वाढले आहे.

# ६० कोटी घोटाळ्या प्रवीण जैन यांचा खळबळ जनक दावा

## बिले तयार करणाऱ्या विभागप्रमुखाला जबाबदार धरणे आवश्यक; प्रवीण जैन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अर्थसंकल्पात नवीन कामाचा समावेश, प्रशासकीय, तांत्रिक मान्यता आणि काम पूर्ण होईपर्यंत तरतूद, तरतूद संपल्यास स्थायी समिती किंवा महापालिका सभेकडे विषयपत्र सादर करणे, उपसूचनेद्वारे वाढ व घट करणे, कामाची बिले तयार करण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे. त्याला कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, उपलेखापाल, लेखापाल, लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता, सहशहर अभियंता व शहर अभियंता हे जबाबदार असतात.**



बिले तयार करणाऱ्या विभागप्रमुखाला जबाबदार धरणे आवश्यक आहे, असे पत्र सक्तीच्या रजेवर असलेले महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी दक्षता विभागाला दिले आहे.

वेगवेगळ्या 14 बोगस उपसूचनांद्वारे तब्बल 60 कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना 30 मार्चच्या रात्री देण्यात आली आहेत. तो आर्थिक घोटाळा शहरात गाजत आहे. त्या प्रकरणी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहेत. तर, चौकशी समितीने प्राथमिक अहवाल आयुक्तांना सादर केला आहे. त्यावरून प्रवीण जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महापौर रवी लांडगे यांच्यासह स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. तसे न केल्यास आम्ही गुन्हा दाखल करू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

त्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी जैन यांनी महापालिकेच्या दक्षता विभागास शुक्रवार (दि. 17) पत्र दिले आहे. सर्व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण केल्याची खात्री करूनच संबंधित विभागप्रमुखाने कामकाजाची बिले तयार करून घेऊन त्यावर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. विभागप्रमुख ती जबाबदारी झटकू शकत नाही. उपसूचनेच्या प्रकरणामध्येही जी कामे चालू असून, ज्या कामांना तरतूद उपलब्ध नाही, अशा कामांना तरतूद उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे. त्यानुसार, कनिष्ठ अभियंता, उपअभियंता व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या उपसूचनांच्या आधारे त्या मान्य असल्यानेच बिले तयार केली. त्या उपसूचना मान्य असल्याने सर्वांनी बिलावर स्वाक्षरी करून बिले लेखा विभागाकडे सादर केली.

दरम्यान, संबंधित विभागप्रमुखांनी उपसूचना मान्य असल्याने लेखा विभागाला बिले सादर केली. या उपसूचना 24 मार्चच्या अर्थसंकल्पाच्या महापालिका विशेष सभेच्या अनुषंगाने लेखा विभागाकडे सादर केल्या होत्या. त्यामुळे उपसूचना या सन 2025-26 चे सुधारित अर्थसंकल्पामधील तरतुदींच्या वाढ व घट संदर्भातील असल्याने 31 मार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने ही बिले देणे आवश्यक होते. या प्रकरणी बिले तयार करणाऱ्या विभागप्रमुखाला प्रथम जबाबदार धरणे आवश्यक आहे. संबंधित विभाग प्रमुखांनी उपसूचना मान्य नसल्यास बिले तयार करायची नव्हती. बिले तयार झाली नसती तर, ती लेखा विभागाला प्राप्त झालीच नसती, असे जैन यांनी पत्रात नमूद केले आहे. बोगस उपसूचनांद्वारे तब्बल 60 कोटी रुपयांची बिले परस्पर ठेकेदारांना देण्यात आली आहेत. त्या घोटाळ्यात सामील असलेल्यांची नावे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी जाहीर करावीत.

### आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष

सक्तीच्या रजेवर असलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी महापालिकेच्या दक्षता विभागास पत्र लिहून बिले तयार करणाऱ्या विभागप्रमुखांवर कारवाईची मागणी केली आहे. त्यांच्यावरही कारवाई करा, असा जैन यांचा तक्रारीचा सूर दिसून येत आहे.

# प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे पिंपरीतील क्रीडांगण बनले गोठा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरीगावातील पवनेश्वर मंदिराजवळील महापालिकेच्या क्रीडांगणाच्या कामात प्रशासनातील समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. स्थापत्य आणि क्रीडा विभाग एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकत आहेत. परिणामी उद्घाटन, लोकार्पण न होता क्रीडांगण वापराविना पडून आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही याकडे दुर्लक्ष केले आहे.**



पिंपरीगावात पवना नदीच्या काठावर क्रीडांगण विकसित करण्यात आले आहे. येथे जॉगिंग ट्रॅक, कुस्तीचा आखाडा उभारण्यात आला आहे. मात्र, क्रीडांगणाच्या एका बाजूला सुरक्षाभिंतीऐवजी तारेचे कुंपण आहे. काही ठिकाणी तारा तोडण्यात आल्या आहेत. क्रीडांगणामध्ये भटक्या श्वानांचा आणि मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. क्रीडांगणात सर्वत्र जनावरांचे शेण पडलेले पहायला मिळत आहे.

क्रीडांगणामधील पाण्याच्या टाकीला झाकण गायब झाले आहे. त्यामुळे येथे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनामध्ये या क्रीडांगणाबाबत समन्वयाचा अभाव आहे. स्थापत्य विभागाकडून क्रीडांगण विकसित करण्यात आले. क्रीडांगण क्रीडा विभागाकडे हस्तांतरीत केले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. मात्र, कामे अपूर्ण असून आम्ही आमच्या ताब्यात क्रीडांगण घेतलेले नाही, असे क्रीडा विभागाकडून सांगण्यात येत आहे.

क्रीडांगणाचे काम पूर्ण करून समस्या सोडविण्याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यासोबतच स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनही याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. क्रीडांगणामधील पाण्याच्या टाकीला झाकण नाही. झाकण नसल्यामुळे त्यामध्ये डासांची पैदास होत आहे. झाकणा नसल्यामुळे टाकीमध्ये पडून लहान मुलांना किंवा इतर कोणालाही अपघात होऊ शकतो. क्रीडांगणाचे काम पूर्ण करण्यात यावे, अशी नागरिकांची मागणी आहे. क्रीडांगणाचे काम झाल्यानंतर ते क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. संबंधित विभागांकडून सूचविण्यात आलेली कामे आमच्या विभागाकडून करून देण्यात येतील, असे उद्यान स्थापत्य विभागाचे म्हणणे आहे.

> क्रीडांगणाची काही कामे राहिली आहेत. एका बाजूला तारेचे कुंपण आहे. तेथे सुरक्षाभिंत उभारण्यासह इतर कामे करायची आहेत. क्रीडांगणाच्या सुरक्षाभिंतीचे काम करून द्यावे, स्वच्छतागृह उभारावे, सुरक्षारक्षकांसाठी कक्ष असावा, अशा विविध कामांबाबत संबंधित विभागाला पत्र दिले आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर क्रीडांगणाचा ताबा घेण्यात येईल.
>
> **- पंकज पाटील, उपायुक्त, कीडा विभाग, महापालिका**

### अतिक्रमण, स्मोकिंग झोन

काही जणांकडून क्रीडांगणाचा गोम्यासारखा वापर केला जात आहे. जनावरे बांधून चारा व इतर साहित्य ठेवून अतिक्रमण केले आहे. काही जण धूम्रपानासाठी क्रीडांगणात येतात. सुरक्षारक्षक नियुक्त केलेले नाहीत. कुस्तीच्या आखाड्याची सुद्धा दुरवस्था झाली आहे.



## भूमिका

# संभाव्य दुष्काळाची छाया आणि वास्तव



**हवामान विभागाने 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमी, सुमारे 92 टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केल्यानंतर राज्य सरकार सक्रिय झाले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 20 एप्रिल 2026 रोजी उच्चस्तरीय बैठक घेऊन जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि पशुखाद्य नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले.**

जलयुक्त उपक्रम, गाळ काढणे, शेततळे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि चारा विकास यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवण्याचे आदेश देण्यात आले. मात्र, या सूचनांची अंमलबजावणी वेळेत होईल का, हा खरा प्रश्न आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि काही पश्चिम भागात पावसाची कमतरता जाणवण्याची शक्यता आहे. विदर्भात काहीसा दिलासा असला, तरी एकूण अनिश्चितता कायम आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीचा विचार करता, या परिस्थितीचा थेट परिणाम उत्पादन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार एप्रिल 2026 अखेर राज्यातील धरणांमध्ये सुमारे 650 टीएमसीपेक्षा अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे. वरकरणी हा साठा समाधानकारक वाटतो, मात्र विभागनिहाय चित्र वेगळे आहे. कोकण आणि पश्चिम भागात तुलनेने चांगला साठा असला, तरी मराठवाडा आणि भीमा खोऱ्यातील धरणांमध्ये वापरण्यायोग्य पाणी मर्यादित आहे. उत्तर महाराष्ट्रातील काही शहरांना ऑगस्टपर्यंत पुरेल एवढाच साठा असल्याचे संकेत आहेत, तर काही ठिकाणी पाणी कपातीचे नियोजनही सुरू झाले आहे.

2014 आणि 2015 च्या अनुभवाकडे पाहिले तर, त्या काळातही 'एल निनो'मुळे मान्सून कमकुवत झाला होता. मराठवाड्यातील काही धरणे जवळपास कोरडी पडली होती. लातूरसारख्या शहरांना रेल्वेने पाणी आणण्याची वेळ आली होती. अनेक तालुक्यांमध्ये टँकरवर अवलंबून राहावे लागले आणि शेती मोठ्या प्रमाणावर कोरडी पडली. सध्याची परिस्थिती त्या तुलनेत थोडी सुधारलेली वाटत असली, तरी हवामानातील अनिश्चितता पाहता धोका तसाच कायम आहे.

सरकारने चारा विकास कार्यक्रमालाही प्राधान्य दिले आहे, मात्र चारा पिकांना कापणीसाठी किमान 45 ते 70 दिवस लागतात. त्यामुळे ही योजना तातडीच्या उन्हाळी टंचाईवर उपाय म्हणून उपयुक्त नसून, पुढील हंगामासाठीच अधिक महत्त्वाची ठरेल. जलसंधारणाच्या कामांबाबतही अशीच स्थिती आहे. रोजगार हमीच्या अटींमुळे कामांचा वेग कमी राहतो, तर निधीची उपलब्धता आणि वेळेवर वितरण हे मोठे आव्हान आहे.

एकूण परिस्थितीचा विचार करता, सरकारची दिशा योग्य असली तरी वेळ आणि अंमलबजावणी हीच खरी कसोटी आहे. केवळ बैठका आणि घोषणांवर न थांबता, स्थानिक पातळीवर तातडीने प्रभावी उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. अन्यथा, आजचा आशावाद उद्याच्या संकटात बदलण्यास वेळ लागणार नाही.

## प्रासंगिक »

### असत्य

**एका प्रख्यात वकिलाकडे एक गरीब शेतकरी गेला. त्याची केस साधीच होती. त्यातून सुटायचे होते. पण साक्षी-पुरावे, उलट-तपासणीत त्याला बोलता आले नसते.**

गरीब, अशिक्षित शेतकरी होता तो. वकिलाने यावर तोडगा काढला. तो शेतकऱ्याला म्हणाला, "दादा ! घाबरू नका. मी सांगेन तसं करा. मी सोडवतो तुम्हाला यातून." शेतकरी खुश झाला. त्याला वकिलाने सांगितले की, 'कोणत्याही प्रश्नाला उत्तर देऊ नका. त्याऐवजी फक्त बें बे असं ओरडा.' साक्षीच्या वेळी शेतकऱ्याने तसे केले. तेव्हा वकील म्हणाला, "हा शेतकरी अशिक्षित आहे आणि थोडा वेडाही आहे." अशा प्रकारे युक्तिवाद करून त्याने ती केस जिंकली. शेतकरी खुश होऊन घरी घरी जाऊ लागला. तेव्हा वकील म्हणाला, "दादा ! तुमची केस जिंकली. नुकसंभारपाईसुद्धा मिळाली. आता माझी फी द्या." शेतकऱ्याने वकिलांकडे रोखून पाहत उत्तर दिले. "बें-बें" वकिलाच्या खोटेपणाचा उपाय त्याच्यावरच उलटला.

- तात्पर्य : भिअसत्य असे माणसावर या ना त्या रूपाने उलटले. म्हणून सत्याने वागावे.

हंगेरीतील अलीकडील निवडणूक निकाल हा केवळ एका देशाच्या राजकीय बदलाची गोष्ट नाही, तर जगभरातील सत्ताधीशांना एक महत्त्वाचा धडा देणारी ऐतिहासिक घटना आहे. जनतेला गृहित धरून चालवलेल्या मनमानी कारभाराचा अंत अटळ असतो, हेच या निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# हंगेरीतील लोकशाहीचा विजय: ऑर्बान युगाचा अस्त




निवडणुकीच्या अंतिम निकालांनी राजकीय वर्तुळात खळबळ माजवली. टिस्झा पक्षाने 199 पैकी तब्बल 141 जागांवर दणदणीत विजय मिळवला. हे संख्याबळ दोन तृतियांश बहुमतापेक्षा अधिक असल्याने, घटनात्मक सुधारणा मंजूर करण्यासाठी आवश्यक ते पाठबळ टिस्झा पक्षास आता मिळाले आहे. याउलट, गेली सोळा वर्षे सत्तेत असलेल्या व्हिक्टर ऑर्बान यांचा फिडेझ पक्ष अवघ्या 52 जागांवर सिमित राहिला आणि अभूतपूर्व पराभवाच्या खाईत लोटला गेला. दीड दशकानंतर प्रथमच पीटर मॅग्यार यांच्या रूपात हंगेरीला नवा पंतप्रधान मिळणार आहे.

व्हिक्टर ऑर्बान यांची 16 वर्षांची कारकीर्द म्हणजे लोकशाहीच्या चौकटीत राहून लोकशाहीला पोखरण्याचा एक धक्कादायक प्रयोग होता. 2010 मध्ये सत्तेवर परतल्यानंतर त्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे सत्तेची सूत्रे आपल्या हाती केंद्रित केली. प्रचंड बहुमताचा आधार घेत राज्यघटनेत अनुकूल बदल केले, निवडणूक कायदे सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावर पडतील असे घडवले आणि नागरी, शैक्षणिक, सांस्कृतिक व सहकारी क्षेत्रातील स्वायत्त संस्थांवर पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित केले. विदेश धोरणातही परस्परविरोधी शक्तींना संतुष्ट ठेवत स्वतःसाठी बाह्य अनुकूलता निर्माण केली.

ऑर्बान यांच्या अतिउजव्या विचारसरणीने राष्ट्रीय अस्मिता आणि देशभक्तीची भाषा वापरून जनमानसावर पकड मिळवली. फुटबॉल सामन्यांसारख्या दैनंदिन गोष्टींनाही उजव्या विचारसरणीच्या समर्थनाशी जोडण्याचा चातुर्यपूर्ण प्रयत्न केला गेला.

ऑर्बान सरकारने माध्यमस्वातंत्र्यावर सर्वात घातक घाव घातला. सर्वप्रथम राष्ट्रीय प्रसार यंत्रणेत पक्षनिष्ठांचा भरणा करून तिचे सरकारी प्रचार यंत्रात रूपांतर केले. त्यानंतर फिडेझशी जवळीक असलेल्या धनदांडग्यांनी टप्प्याटप्प्याने खासगी माध्यमसंस्था विकत घेतल्या. या प्रक्रियेत देशातील जवळपास 80 टक्के प्रसारमाध्यमे सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आली. उरलेल्या स्वतंत्र माध्यमांना नमवण्यासाठी अनेक क्लृप्त्या वापरल्या गेल्या.

## ।। अभंगवाणी ।।



हातीं घेऊनियां काठी ।
तुका लागला कलेवरा पाठी ॥१॥

नेऊनि निजविलें स्मशानीं ।
माणसें जाळी ते ठाकणीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ज्या मुलीला मदत केली तीच प्रेमात पडली

## गुजराती पत्नी, मराठी भाषा आणि राजकारणावर मंत्री प्रताप सरनाईक यांची भूमिका स्पष्ट

**महाईन्यूज । मुंबई**

**रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठीच्या सक्तीवरुन राज्यात वातावरण काहीसे तापले आहे. मराठी अनिवार्य करण्याबाबत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाम भूमिका घेतली आहे. भाषा सक्तीला विरोध केल्यास सरनाईक यांनी कादेशीर आयुधं वापरण्याची देखील तयारी दर्शवली आहे. भाषा सक्तीच्या विषयासह मंत्री सरनाईक यांनी त्यांचा राजकीय प्रवास आणि प्रेम विवाह यावर भाष्य केले आहे.**



### माझी पत्नी गुजराती

वयाच्या १८ व्या वर्षापासून ते विद्यार्थी चळवळीत सक्रिय असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्या प्रेमविवाहाचा रंजक किस्सा सांगितला. माझी पत्नी गुजराती आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी या मुलाखतीत सांगितले. पत्नी फक्त मराठी भाषेत संवाद साधते असेही त्यांनी पुढे सांगितले. पण, भांडण मात्र गुजराती भाषेत करते असेही ते गंमतीत म्हणाले, सरनाईक यांना देखील गुजराती भाषा येते असे त्यांनी स्पष्ट केले. सुरुवातीच्या काळात त्यांनी रिक्षा चालवली आणि भुर्जी-पावची गाडीही चालवली. या कठीण काळात त्यांच्या पत्नीने त्यांना खंबीर साथ दिल्याचे मंत्री सरनाईक यांनी या मुलाखतीत सांगितले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी न्यूज-१८ दिलेल्या मुलाखतीत विविध विषयांवर भाष्य केले. सरनाईक यांनी यावेळी रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेच्या अनिवार्यतेबाबत शासनाची भूमिका स्पष्ट केली. प्रवाशांच्या तक्रारींनंतर हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. १०-१५ वर्षे महाराष्ट्रात राहूनही रिक्षा किंवा टॅक्सी चालक मराठीत बोलत नाहीत, त्यामुळे वाद निर्माण होतात, अशी तक्रार अनेक प्रवासी करतात. आणि राज्य शासनाचा १९८९ चा अधिनियम आणि २०१९ चे परिपत्रक यानुसार मराठी भाषेबद्दल आधीच तरतूद आहे. परिवहन मंत्री म्हणून ते फक्त या नियमांची अंमलबजावणी करत आहेत, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

मंत्री सरनाईक यांनी यावेळी इतर राज्यांचे उदाहरण देखील दिले. “कर्नाटक, तेलंगणा किंवा केरळ या राज्यांमध्ये तेथील स्थानिक भाषेतच संवाद साधला जातो, मग महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरण्यात चुकीचे काय?”, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ”प्रवाशांना त्यांच्या भाषेत सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. चालकांनी प्रगल्भ मराठी बोलावी अशी अपेक्षा नाही, पण किमान संवाद साधण्याइतपत मराठी येणे आवश्यक आहे,” असे मंत्री सरनाईक म्हणाले. ”ज्या चालकांना मराठी येत नाही, त्यांच्यासाठी मुंबई साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांनी पुढाकार घेऊन शिकवण्यासाठी तयार आहे”, असे सरनाईक पुढे म्हणाले.

प्रताप सरनाईक राजकारणात अचानक आलेले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वयाच्या १८ व्या वर्षापासून ते विद्यार्थी चळवळीत सक्रिय असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्या प्रेमविवाहाचा रंजक किस्सा सांगितला. “घराच्या शेजारीच राहणाऱ्या एका मुलीला दहावीचा निकाल एक दिवस आधी मिळवून दिला होता. यामुळे ती मुलगी खूप खूश झाली. यानंतर या मुलीला डोंबिवलीच्या शाळेत प्रवेश देखील मिळवून देण्यातही मदत केली. या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्या मुलीचे १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर आम्ही लग्न केले”, असा किस्सा सरनाईक यांनी सांगितला.

# शिवाजी महाराज पूज्यनियच, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला

**महाईन्यूज । नागपूर**

**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू राष्ट्राचा संकल्प करून हिंदवी स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली. त्यांनी दाखविलेल्या वाटेवर वाटचाल सुरु असून त्यांच्या विचारधारेला माझे जीवन समर्पित केले आहे. परंतु माझ्या बोलण्याचा विपर्यास करून सोशल मिडियावर चुकीचे वक्तव्य मांडण्यात आले. त्यामुळे कुणाची मने दुखावली गेली असल्यास मी माफी मागतो, असे म्हणून माध्यमांवर खापर फोडत बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री महाराज यांनी शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वक्तव्याबाबत पत्रकार परिषदेत माफी मागितली.**



### ‘बुरखाधारी’ बनु नका

धीरेंद्र शास्त्री महाराज म्हणाले, हिंदु मुलींनी सोशल मिडियावर रिल पाहताना आपण ‘रियल’ कोण आहोत याचे भान ठेवण्याची गरज आहे. तुम्ही सैन्यात जा, डॉक्टर बना, दुर्गा किंवा काली बना. परंतू बुरखाधारी कधीही बनु नका. चार मुले करून त्यातील एक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्या या वक्तव्याबाबत माझ्यावर टीका करण्यात येत आहे. परंतु लोकसंख्या नियंत्रण कायद्यात केवळ दोनच मुले जन्माला घालावीत, अशी अट आहे. ही अट हिंदुनाच का आहे. ‘चच्चे’ला ३० मुले झाली तरी चालतात मग हिंदुंना का नाही. मी विवाह बंधनात अडकल्यानंतर माझीही मुले देशासाठी देईन, असे त्यांनी सांगितले.

रेशीमबाग येथील मैदानावर रविवारपासून बागेश्वर धामचे महाराज धीरेंद्र शास्त्री यांची रामकथा आयोजित करण्यात आली. या रामकथेसाठी हजारो भाविक नागपूर आणि आसपासच्या जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्थानिक प्रशासनाने विशेष बंदोबस्त तैनात केला होता. रामकथेपूर्वी धीरेंद्र शास्त्री महाराजांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, हिंदुत्वाचे श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांनाच आहे. संभाजी ब्रिगेड, मराठा महासंघाची लोक आपलीच आहेत. आम्ही आपसात भांडलो तर इतरांना संधी मिळेल. शिवाजी महाराजांना संत-महंत, गुरुप्रती किती आदर होता, हे सांगण्याचा प्रयत्न मी दोन दिवसांपूर्वी केला. परंतु प्रसार माध्यमांनी ते चुकीच्या पद्धतीने मांडले. शिवाजी महाराजांबद्दल स्वप्नातही कोणी अपशब्द काढल्यास मी ते सहन करू शकत नाही. हिंदुत्वाच्या प्रसारासाठी लवकरच रथयात्रा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही रथयात्रा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधून काढण्याचे नियोजन असून त्याद्वारे हिंदू एकतेचा संदेश देण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, भारतात, महाराष्ट्रात लव्ह जिहादचे प्रमाण वाढले आहे. सोशल मिडियावर चांगले दिसून चांगले बोलून हिंदु मुलींना जाळ्यात ओढल्यानंतर त्यांच्यावर आपला धर्म लादला जात आहे.

मध्यप्रदेशात मागील वर्षी लव्ह जिहादची २८० प्रकरणे घडली. प्रेम करणे चुकीचे नाही. पण संस्कृतीचे हनन योग्य नाही. त्यासाठी हिंदु धर्मविरोधी ताकदींना वेळीच पायबंद घालण्याची गरज असून त्यासाठी कठोर कायदा करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याकडे लक्ष देतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. फडणवीस सरकारने याबाबत तातडीने पाऊले उचलावीत, यासाठी विविध हिंदू संघटनांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली आहे. अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या आव्हानाबाबत ते म्हणाले, आम्हाला कोणालाही प्रमाण देण्याची गरज नाही. आम्ही स्व:तशी जोडण्यासाठी नव्हे तर हनुमानाशी जोडण्यासाठी भाविकांना दरबारात बोलावतो. परंतु संतांना तुच्छ लेखण्याचा प्रयत्न काहीजण करीत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या विरोधाला न जुमानता आपण आपले कार्य अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचे धीरेंद्र शास्त्री यांनी ठामपणे सांगितले. धर्म आणि संस्कृतीचे रक्षण करणे हेच जीवनकार्य असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले. ही माफी म्हणजे शब्दांची औपचारिकता नसून एक जबाबदार संतांची भूमिका असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे सोशल मिडियावर मोठी चर्चा सुरू झाली असून अनेक संघटनांनी आपल्या भूमिका स्पष्ट केल्या.

# अन्याय वाढतो तेव्हा जनताच दुर्गा बनते

## आता दहशत संपली, विश्वास सुरू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**महाईन्यूज । कोलकाता**

**जेव्हा अन्यायाची परिसीमा गाठली जाते तेव्हा जनता स्वतःच देवी दुर्गेचा अवतार घेते आणि परिवर्तन घडवते. दहशत संपली, विश्वास सुरू, असे प्रतिपादन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पश्चिम बंगालमध्ये सत्तांतराची हाक दिली. राज्यातील उत्तर 24 परगणा जिल्ह्यातील बनगाव आणि हुगली जिल्ह्यातील हरिपाल येथे मोदींच्या सभा झाल्या, तर कोलकात्यात त्यांनी भव्य रोड शोही केला.**



मोदी म्हणाले, 15 वर्षांपूर्वी तृणमूल पक्ष 'माँ, माटी, मानुष'चा नारा देऊन सत्तेत आला. मात्र आज त्या घोषणेमागील मूल्येच हरवली आहेत. माँ, माटी, मानुषचा सन्मान तृणमूलने राखला नाही. तृणमूलच्या महाजंगलात असलेल्या राज्यात छोट्या नेत्यांपासून गुंडांपर्यंत सर्वजण स्वतःलाच सरकार समजू लागले आहेत. पहिल्या टप्प्यातच मतदानानंतर तृणमूलचा अहंकार गळून गेला आहे. दुसऱ्या टप्प्यात भाजपचा विजय निश्चित दिसत आहे. मोठ्या प्रमाणावर झालेल्या मतदानामुळे सत्ताधारी पक्ष चिंतेत आहेत.

ते म्हणाले, एकेकाळी कारखान्यांनी गजबजलेला हुगळी परिसर आज ओस पडलेला आहे. इंग्रज काळापासून सुरू असलेले बनगाव ते बराकपूर या पट्ट्यातील अनेक कारखाने बंद पडले आहेत. आता येथे 'कट-मनी' आणि 'कमिशन'चीच व्यवस्था उरली आहे. तृणमूल सरकार अत्याचार करणाऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. 4 मे नंतर भाजप सत्तेत आल्यावर अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा दिली जाईल. येथील युवकांमध्ये प्रचंड सर्जनशीलता आहे. योग्य संधी मिळाल्यास ते देशाला पुढे नेऊ शकतात. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या बंगाली कंटेंटचाही त्यांनी उल्लेख केला.

मोदींनी भाषणादरम्यान, स्थानिक नागरिक सध्या 'पलटानो दरकार' म्हणजे बदल गरजेचा आहे - हा एकच नारा देत असल्याचा दावा केला. दरम्यान, मोदींनी ठाकूरनगर येथील मतुआ ठाकूर मंदिरात दर्शन घेतले आणि स्थानिक समुदायाशी संवाद साधला. कोलकात्यात रोडशो पूर्वी मोदींनी 1703 मध्ये स्थापन केलेल्या माँ सिद्धेश्वरी मंदिरातील थंथानिया कालीबाड़ी येथे काली मातेचे दर्शन घेतले. येथे मांसाहारी नैवेद्याची प्रथा रामकृष्ण परमहंस यांनी सुरू केली होती. आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी कोलकात्यात तृणमूल काँग्रेसच्या समर्थनार्थ आयोजित सभेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जींना उघड पाठिंबा दर्शवला.

### बंगालमध्ये 'गुंडाराज'

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे गुंडाराज सुरू असल्याची टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली. आसनसोल भागात काँग्रेस कार्यकर्ता देबदीप चॅटर्जी यांच्या कथित हत्येनंतर राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर म्हटले की, 'तृणमूलशी संबंधित गुंडांकडून काँग्रेस कार्यकर्त्याची हत्या होणे अत्यंत निंदनीय आहे. बंगालमध्ये मतदानानंतर विरोधकांना धमकावणे, मारणे आणि संपवणे हे तृणमूलचे धोरण बनले आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही लढत राहू.'

## अमेरिका-इराण चर्चेचा पेच सुटेना! इराणचे परराष्ट्र मंत्री अराघची पुन्हा इस्लामाबादमध्ये

**महाईन्यूज । इस्लामाबाद**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष संपवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये पुन्हा चर्चा सुरू व्हावी यासाठी पाकिस्तानकडून मध्यस्थीचे प्रयत्न केले जात आहेत. यादरम्यान इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची हे रविवारी पुन्हा पाकिस्तानात पोहोचले आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार अराघची शनिवारी रात्री उशीरा पाकिस्ताची राजधानी इस्लामाबादहून निघून गेले होते. ज्यामुळे चर्चेच्या दुसऱ्या फेरीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र मॉस्को दौऱ्यावर जाण्याच्या आधी अराघची पुन्हा इस्लामाबादला परत आले आहेत.**



दरम्यान दुसरीकडे या महिन्याच्या सुरुवातीला झालेली चर्चा व्यर्थ ठरल्यानंतर चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी अमेरिकन शिष्टमंडळ कधी परत येऊ शकते, याबद्दल अद्याप पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे इराण-अमेरिका यांच्यातील चर्चेबाबत अनिश्चितता अद्यापही कायम आहे.

चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांना इस्लामाबादला पाठवणार असल्याचे व्हाईट हाऊसने शुक्रवारी सांगितले होते. त्यामुळे युद्ध संपवण्याबाबत सकारात्मक घडामोडी होण्याच्या आशा निर्माण झाल्या होत्या. पण अमेरिकेशी थेट चर्चा करणार नाही, या भूमिकेवर इराण ठाम राहिला.

अराघची पाकिस्तानातून रवाना झाल्याची बातमी येताच काही वेळातच अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, इराणबरोबरच्या चर्चेत कोणतीही प्रगती न झाल्यामुळे त्यांनी हे मिशन रद्द करण्यात आले आहे. “त्यांना जेव्हा वाटेल तेव्हा ते आम्हाला बोलावू शकतात,” असे ट्रम्प यावेळी म्हणाले होते.

अराघची यांनी शनिवारी पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असिम मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली. आपल्या मागण्या मांडताना अमेरिकेच्या अतिरिक्त मागण्या आम्हाला मान्य नाहीत, असे अराघची यांनी पाकिस्तानला सांगितले. चर्चेचे ठोस निष्कर्ष निघेपर्यंत आपण पाकिस्तानशी चर्चा करत राहू असे अराघची यांनी पाकिस्तानच्या नेत्यांना कळवले.

होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्यामुळे युद्ध संपवण्यासाठीचा दबाव आता वाढला आहे. मात्र, इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड्सनी सामुद्रधुनीची नाकेबंदी उठवण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे जगाची चिंता वाढली आहे.

रिव्हॉल्युशनरी गार्ड्सनी त्यांच्या अधिकृत टेलिग्राम चॅनेलवर म्हटले आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवणे आणि या प्रदेशातील अमेरिका व व्हाईट हाऊसच्या समर्थकांवर आपला प्रभाव कायम ठेवणे, ही इस्लामिक इराणची निर्णायक रणनीती आहे.

### इराणची नाकेबंदी

दरम्यान दुसरीकडे याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केली आहे. दरम्यान, सरकारी प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात इराणच्या लष्कराने इशारा दिला आहे की, अमेरिकेने केलेल्या या नाकेबंदीला चोख प्रत्युत्तर दिले जाईल.



# अन् ‘नो किसिंग’चा नियम मोडला

२०२३ मध्ये काजोलने ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण केले. ‘द ट्रायल- प्यार, कानून, धोखा’ या वेब सीरिजमध्ये तिने काम केले. ओटीटीवर पदार्पण करताच काजोलने तिची अनेक वर्षांपासूनची ‘नो किसिंग पॉलिसी’ मोडली होती. या सीरिजमधील अभिनेता जिशू सेनगुप्तासोबत तिचा किसिंग सीन चांगलाच चर्चेत होता. पडद्यावर कधीच किसिंग सीन करायचा नाही, हा काजोलचा नियम होता. माध्यमाला बोलताना काजोल म्हणाली, की खरे सांगायचे तर हा त्या सिझनचा विषय होता. त्या भूमिकेसोबत आणि ती नेमकी कशी आहे, हे पडद्यावर दाखवण्याबाबत बरेच काही करता येण्यासारखे होते. तो फक्त साधा किस नव्हता, ती काय विचार करत होती आणि तिला काय करायचे होतं, तिच्यासाठी काय घडले नव्हते. याबद्दल ते सर्वकाही होते. तिचा कशावर विश्वास होता, कशावर श्रद्धा होती, कशावर नव्हती यासंदर्भात ते होतं. तो किसिंग सीन त्या सीरिजच्या संपूर्ण पटकथेचा महत्त्वाचा भाग होता. त्यामुळे त्या भूमिकेतून मी तो भाग काढून टाकू शकत नव्हते. ती त्या सीनची, त्या कथेची, त्या सीरिजची गरज होती. मला असे वाटते, मी अन्कम्फर्टेबल होते. सेटवर उभं राहेपर्यंत माझ्यासाठी ते प्रचंड अन्कम्फर्टेबल होतं. मला थिअरीमध्ये ते आवडलं होतं आणि मी खरंच तो सीन करणार का याबद्दल मलाच खात्री नव्हती. कट, हे मी करणार नाही.. असे मी त्यांना बोलेन का, हेसुद्धा मला माहीत नव्हतं. पण तो फक्त एक सीन होता. प्रोफेशनल दृष्टीकोनातून तुम्हाला काही निर्णय घ्यावे लागतात आणि मला त्यावेळी असं वाटलं की मी आता तो निर्णय घेऊ शकते. या सीरिजमध्ये काजोलने नोयोनिका सेनगुप्ताची भूमिका साकारली होती, जी एक गृहिणी असते, परंतु पतीच्या स्कँडलनंतर ती कायदेक्षेत्रात पुन्हा परतते.




# श्रेया घोषालने 3 महिन्यात खरेदी केली 3 आलिशान घरं

संगीतसृष्टीतील सर्वात प्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल ही पुन्हा चर्चेत आली आहे. तिने तिच्या आयुष्यात अनेक सुपरहिट सिनेमांची गाणी गायली आहे. तिने तिच्या करिअरची सुरुवात एका रिॲलिटी शोमधून केली होती. श्रेयानं 'देवदास' चित्रपटासाठी पहिलं गाणं रेकॉर्ड केलं होता. आतापर्यंत तिने अनेक गाणी गायली. आता ती तिच्या लग्जरी लाईफस्टाईलासाठी सुद्धा चर्चेत असते. अशातच श्रेयाने तीन महिन्यात तब्बल तीन नवीन आलिशान मालमत्ता खरेदी केली आहे. माहितीनुसार श्रेया घोषलने तीन महिन्यात तीन नवीन आलिशान मालमत्ता खरेदी केली आहे. तसंच या मालमत्ताची किंमत जवळपास ८० कोटी रुपयांपर्यंत असल्याचं सांगितलय. तिने मुंबईतील वेगवेगळ्यात भागांमध्ये तिने व्यवहार केला आहे. तिने मोठी आलिशान घरं खरेदी केली आहेत. सध्या ती तिच्या नवीन अपार्टमेंट खरेदीमुळे चर्चेत आलीय. श्रेया घोषालने सांताक्रुझ वेस्ट इथं एका लग्जरी अपार्टमेंट खरेदी केलं आहे. शरमिष्ठा घोषाल आणि बिश्वजीत घोषाल यांच्या पार्टनशिपमध्ये तिने ही गुंतवणूक केलीय. तसंच तिने तीन महिन्यात मुंबईत तिसरी हाय-ॲण्ड प्रॉपर्टी खरेदी केली आहे. या प्रॉपर्टीची किंमत २०.८८ कोटी रुपये आहे. याआधी तिने वर्लीमध्ये मोठं अपार्टमेंट खरेदी केलय. या सगळ्याची किंमत ६० कोटी रुपये आहे. तिने खरेदी केलेल्या एक अपार्टमेंट मुंबईच्या सरोजिनी रोडवरील 'वायु' बिल्डिंगमध्ये आहे.

# अभिनेत्री ज्योती सक्सेना वादाच्या भोवऱ्यात

विवस्त्र व्हिडीओ कॉल करते, वीस हजार दे, अशी कथित मागणी केल्याच्या आरोपामुळे अभिनेत्री ज्योती सक्सेना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. एका विद्यार्थ्यासोबतचे कथित अश्लील चॅट्स सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. व्हायरल झालेल्या स्क्रीनशॉट्सनुसार, संबंधित चॅटमध्ये व्हिडीओ कॉलच्या बदल्यात पैशांची मागणी करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. सुरुवातीला २० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे दिसते. मात्र, समोरची व्यक्ती विद्यार्थी असल्याचे सांगितल्यानंतर ही रक्कम कमी करून ८ हजार रुपये करण्यात आल्याचा उल्लेख या चॅट्समध्ये आहे. हे स्क्रीनशॉट्स समोर आल्यानंतर सोशल मीडियावर अभिनेत्रीवर टीकेची झोड उठली आहे. दरम्यान, या सर्व आरोपांवर अभिनेत्रीने स्पष्टीकरण देत चॅट्स पूर्णपणे खोटे असल्याचा दावा केला आहे. तिने आपले इन्स्टाग्राम अकाउंट मागील दोन महिन्यांपासून हॅक झाल्याचे सांगितले असून, कोणीतरी तिच्या फोटोंचा गैरवापर करून तिची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करत असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून दोषींवर कारवाई केली जाईल, असा इशाराही तिने दिला आहे. मनोरंजन क्षेत्रात अशा प्रकारचे सायबर गुन्हे वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. प्रसिद्ध व्यक्तींची अकाउंट्स हॅक करून त्यांच्या नावाने चुकीचे संदेश पाठवणे, चाहत्यांची फसवणूक करणे किंवा प्रतिमा खराब करणे, हे प्रकार वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून, या मागे हॅकिंग आहे की अन्य कोणता कट, याचा शोध घेतला जात आहे.


LEGAL NOTICE

It has come to our attention that an unidentified individual has gained unauthorized access to my Instagram account for the last 2 months and is actively misusing my identity, images, and personal brand to spread false and defamatory information.

Be advised that this act constitutes a serious offense under cyber laws, including identity theft, impersonation, and defamation.

Our legal team has already initiated strict action against the individuals involved.

Any person found engaging, encouraging, or spreading such false communication will also held accountable.

We request media personnel, collaborators, general public to refrain from engaging wi ding to any communication from the acco it is fully secured.

This matter is being treated with ut



# संजू सॅमसनने घडवला इतिहास!

## सॅमसनचा आयपीएलमध्ये ५ हजार धावांचा टप्पा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ मधील आज २६ एप्रिलच्या डबल हेडरमधील पहिला सामना चेन्नई सुपर किंग्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळवला जात आहे. सीएसकेच्या घरच्या मैदानावर एमए चिदंबरम स्टेडियममधील या सामन्यात प्रथम फलंदाजी करत असलेल्या चेन्नईची सुरूवात खूप खराब झाली आहे. कर्णधार ऋतुराज गायकवाड मैदानावर कायम असून तो संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न करत आहे. यादरम्यान संजू सॅमसनने मात्र ३ धावा करताच मोठा विक्रम केला.**



सीएसकेचा स्टार खेळाडू संजू सॅमसनने आपल्या डावातील तिसरी धाव पूर्ण करताच आयपीएलमध्ये एक मोठा विक्रम नोंदवला, ज्यामध्ये सॅमसनने एकाच फटक्यात सुरेश रैना आणि एमएस धोनी यांना मागे टाकलं. यादरम्यान पॉवरप्लेमध्ये चेन्नई सुपर किंग्स संघाने ३ विकेट्स गमावत फक्त २८ धावा केल्या होत्या. संजू सॅमसन फक्त ११ धावा करत माघारी परतला, ज्यामुळे चेन्नईच्या धावांना मोठा ब्रेक लागला.

आयपीएलमध्ये संजू सॅमसनची आतापर्यंतची कामगिरी उल्लेखनीय आहे. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात, त्याने कागिसो रबाडाच्या दुसऱ्या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर पॉइंटवरून चौकार मारत आपल्या ५ हजार धावांचा टप्पा गाठला. यासह, संजू सॅमसन आता आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूंमध्ये ५ हजार धावा पूर्ण करणारा सर्वात वेगवान भारतीय खेळाडू ठरला आहे.

सॅमसनच्या आधी हा विक्रम सुरेश रैनाच्या नावावर होता, ज्याने ३,६२० चेंडूंमध्ये आपल्या ५ हजार आयपीएल धावा पूर्ण केल्या होत्या. संजू सॅमसनने हा पराक्रम केवळ ३,५५५ चेंडूंमध्ये केला. सर्वात कमी चेंडूंमध्ये ५ हजार आयपीएल धावा करणारा खेळाडू एबी डिव्हिलियर्स आहे, ज्याने ३,२८८ चेंडूंमध्ये हा पराक्रम केला.




# ऑरेंज कॅपसाठी संगीत खुर्ची! ४ फलंदाजांमध्ये चुरस; विराट ५ व्या स्थानी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल स्पर्धेत आतापर्यंत युवा फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाला ऑरेंज कॅप दिली जाते. पण यावेळी ऑरेंज कॅप मिळवण्यासाठी फलंदाजांमध्ये संगीत खुर्ची सुरु असल्याचं दिसून आलं आहे. जवळपास प्रत्येक सामन्यात ऑरेंज कॅपचं समीकरण बदलताना दिसून येत आहे. सुरुवातीला रोहित शर्माकडे ऑरेंज कॅप होती. त्यानंतर विराट कोहलीने देखील ऑरेंज कॅप पटकावली. पण आता विराट या यादीत पाचव्या स्थानी पोहोचला आहे. दरम्यान सुरुवातीच्या ४ स्थानांवर कोण आहे?**



या स्पर्धेत रविवारी डबल हेडर सामन्यांचा थरार पाहायला मिळाला. दोन्ही सामन्यांमध्ये चौकार आणि षटकारांचा पाऊस पाहायला मिळाला. पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना केएल राहुलने १५२ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने ऑरेंज कॅपवर कब्जा केला. पण ही ऑरेंज कॅप त्याच्याकडे काही मिनिटंच राहिली. कारण अवघ्या काही मिनिटांनंतर वैभव सूर्यवंशीने ही कॅप त्याच्याकडून हिसकावली. केएल राहुलने आतापर्यंत ७ सामन्यांमध्ये फलंदाजी करताना ३५७ धावा केल्या आहेत. पण दुसऱ्या सामन्यात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीने दमदार शतकी खेळी केली. या १०३ धावांच्या खेळीसह त्याने पुन्हा एकदा ऑरेंज कॅप पटकावली. वैभव सूर्यवंशीने आतापर्यंत ८ सामन्यांमध्ये ३५७ धावा केल्या आहेत.

पण ही कॅप वैभवच्या डोक्यावरही फार काळ टिकून राहिली नाही. पुढच्याच डावात, धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्माने वैभव सूर्यवंशीकडून ऑरेंज कॅप हिसकावली. धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्माने दमदार खेळी केली. यासह पुन्हा एकदा ऑरेंज कॅपवर कब्जा केला. अभिषेक शर्माने आतापर्यंत ८ सामन्यांमध्ये ३८० धावा केल्या आहेत. तर हैदराबादचा आणखी एक स्फोटक फलंदाज या यादीत चौथ्या स्थानी आहे. हेनरिक क्लासेनने आतापर्यंत ८ सामन्यांमध्ये ३४९ धावा केल्या आहेत. तर विराट कोहली या यादीत पाचव्या स्थानी आहे. विराट कोहलीच्या नावे ३२८ धावा करण्याची नोंद आहे.

### ऑरेंज कॅपची यादी

अभिषेक शर्मा ( सनरायझर्स हैदराबाद) ३८० धावा
वैभव सूर्यवंशी (राजस्थान रॉयल्स) ३५७ धावा
केएल राहुल (दिल्ली कॅपिटल्स) ३५७ धावा
हेनरिक क्लासेन (सनरायझर्स हैदराबाद) ३४९ धावा
विराट कोहली (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु) ३२८ धावा

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज़™

ePaper

। सोमवार ।
दि. 27 एप्रिल 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पवना धरणात 39% पाणी



महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात शनिवारी (दि. 24) 39 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तीव उन्हामुळे बाष्पीभवन होत असल्याने तसेच, पाण्याची मागणी वाढल्याने धरणातील पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत आहे. हा साठा पिंपरी-चिंचवड शहराला तसेच, इतर भागांना पावसाळ्यापर्यंत म्हणजे जूनअखेरपर्यंत पुरेल इतका असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून 30 लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज 520 एमएलडी पाणी उचलले जाते. पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणी संपूर्ण शहराला पुरवले जाते. एमआयडीसीकडून 30 एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागास पुरवले जाते. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 90 एमएलडी पाणी उचलून चिलखी जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून त्या परिसरात पुरवले जात आहे. संपूर्ण शहराला गेल्या साडेसहा वर्षांपासून दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे.


तीव उन्हामुळे बाष्पीभवन होत असल्याने, पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. धरणात शनिवारी (दि.24) 39 टक्के पाणी साठा शिल्लक आहे. पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहर, एमआयडीसी, काही नगरपालिका व ग्रामपंचयातीला पाणी दिले जाते. धरणातील तो पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यासुरू होईपर्यंत म्हणजे जून महिन्यापर्यंत पुरेल इतका आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## आंद्रा धरणात 46 टक्के जलसाठा

मावळ तालुक्यातील आंद्रा धरणात सध्या 46 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. आंद्रा पाणी योजनेतून महापलिकेकडून निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 90 एमएलडी पाणी उचलले जाते. ते पाणी अधिक दूषित असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे महापालिकेस पाणी शुद्धीकरणावर अधिकचा खर्च करावा लागत आहे. तर, भामा आसखेड धरणात 52 टक्के पाणीसाठा पातळी आहे. अद्याप, भामा आसखेड पाणी योजना प्रकल्प पूर्ण न झाल्याने पिंपरी-चिंचवड शहर 167 एमएलडी पाण्यापासून वंचित आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp



CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीसाठी २८ एप्रिल रोजी महापौर यांच्या हस्ते भूमिपूजन

## भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त सुप्रसिद्ध लोकगायक 'आनंद शिंदे' यांचे गीतगायन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मरणार्थ भव्य सृष्टी उभारण्यात येणार आहे. पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील मोकळ्या जागेत ही सृष्टी साकारली जाणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन मंगळवार, २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते होणार आहे.**





> माता रमाई आंबेडकर यांच्या त्याग, संघर्ष आणि प्रेरणादायी जीवनकार्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. करूणा सामाजिक समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचविणारे हे स्मारक पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक ओळखीत मोलाची भर घालणार आहे.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. तर आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय प्रमुख अतिथी म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव आंबेडकर यांची देखील उपस्थिती असणार आहे.

यांच्यासह महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य अँड. गोरक्ष लोखंडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे तसेच नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, राहुल भोसले, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, डॉ. वैशाली घोडेकर (लोंढे), सारिका मासुळकर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी हे देखील या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत.

पिंपरी चौक येथे नियोजित त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सुमारे २४९८.९७ चौरस मीटर क्षेत्रावर ही सृष्टी उभारली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत सृष्टीला आकर्षक व दर्जेदार स्वरूप देण्यात येणार आहे. यासाठी मजबूत आरसीसी स्ट्रक्चर उभारले जाणार असून, म्युरल्ससाठी स्वतंत्र भिंती आणि आकर्षक जीआरसी काम करण्यात येणार आहे. माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी सुबक चौथरा व प्रतीक्षालय तसेच स्मारक परिसरात स्वतंत्र जिन्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

---

# पावसाळ्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्ती हाताळण्यासाठी नियंत्रण व नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळण्यासाठी तसेच अशी परिस्थिती हाताळण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तर अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद मिळावा, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.**




### क्षेत्रीय कार्यालयानिहाय नियुक्त नियंत्रण अधिकारी

अतिरिक्त आयुक्त (१) – अ, ब,क क्षेत्रीय कार्यालय – ९२७१०५७१०१
अतिरिक्त आयुक्त (२) – ड, इ क्षेत्रीय कार्यालय – ९८९२९८६०९५
अतिरिक्त आयुक्त (३) – फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय – ८६००११२३१३

### क्षेत्रीय कार्यालयानिहाय नियुक्त नोडल अधिकारी

उप आयुक्त ममता शिंदे – अ क्षेत्रीय कार्यालय – ८४५९५३१५२०
उप आयुक्त राजेश आगळे– ब क्षेत्रीय कार्यालय – ९५५२५११९७२
उप आयुक्त अण्णा बोदडे – क क्षेत्रीय कार्यालय – ९९२२५०१९४२
उप आयुक्त सिताराम बहुरे – ड क्षेत्रीय कार्यालय – ९९२३९८९७७४
उप आयुक्त पंकज पाटील– इ क्षेत्रीय कार्यालय – ८३८०८१७८०६
उप आयुक्त संदीप खोत – फ क्षेत्रीय कार्यालय – ७७२२०६०९२६
उप आयुक्त चेतना केरुरे – ग क्षेत्रीय कार्यालय – ९४२०४८४८३१
उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास – ह क्षेत्रीय कार्यालय – ७७४४०००६६८

पावसामुळे शहरात गंभीर पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे रक्षण करणे आणि नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपआयुक्त या पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून व अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नोडल अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई यासारख्या कामकाजाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील पूरनियंत्रण आराखड्यानुसार आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, वैद्यकीय व विद्युत विभागाशी समन्वय साधून पूरनियंत्रण व आपत्कालीन सेवा सुरळीतपणे पार पाडाव्यात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त महापालिका व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या वतीने प्रभात फेरीचे आयोजन

## नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध व स्वच्छतेबाबत करण्यात आली जनजागृती

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**जागतिक हिवताप दिनानिमित्त आज पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) यांच्या वतीने संत तुकाराम नगर तसेच रुग्णालय परिसरात हिवताप (मलेरिया) जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध, नियंत्रण आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.**



प्रभात फेरीदरम्यान जागतिक आरोग्य संघटनेच्या यावर्षीच्या "हिवताप निर्मूलनासाठी कटिबद्ध – आता हे शक्य आहे, आता हे केलेच पाहिजे!" या घोषवाक्याचा प्रसार करण्यात आला. तसेच "कोरडा दिवस पाळा, हिवताप टाळा", "घराभोवती पाणी साठू देऊ नका", "मच्छरदाणीचा वापर करा" आणि "पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा" अशा घोषणा देत प्रतिबंधात्मक उपायांची माहिती नागरिकांना देण्यात आली. हिवताप हा डासांमुळे होणारा आजार असून योग्य काळजी आणि सातत्यपूर्ण जनजागृतीद्वारे त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

या प्रभात फेरीचे आयोजन पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय प्रशासन, जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे (कम्युनिटी मेडिसिन) प्राध्यापक व कनिष्ठ निवासी डॉक्टर, यशवंतराव चव्हाण स्मृती परिचर्या विज्ञान संस्था महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी तसेच कुटुंब कल्याण विभागातील कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून करण्यात आले.

सदर कार्यक्रमास पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे तसेच जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे प्राध्यापक तथा विभागप्रमुख डॉ. हर्षल पांडवे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहयोगी प्राध्यापक डॉ. मुकेश बावा, सहाय्यक प्राध्यापक सॅमसन लिओ यू, आरोग्य सहाय्यक माणिक चव्हाण, एमपीडब्ल्यू संतोष काशीद तसेच कनिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते. यावेळी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत आरोग्याबाबत सतर्क राहण्याचे तसेच हिवतापाची लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

### हिवतापाची लक्षणे अशी ओळखावीत:

- सतत किंवा अधूनमधून येणारा ताप
- थंडी वाजणे आणि अंगावर शहारे येणे
- डोकेदुखी आणि अंगदुखी
- मळमळ किंवा उलट्या
- अशक्तपणा व थकवा जाणवणे
- अचानक घाम येणे

### हिवताप टाळण्यासाठी ह्या उपाययोजना कराव्यात:

- घराभोवती किंवा परिसरात पाणी साचू देऊ नका
- आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळा
- मच्छरदाणीचा नियमित वापर करा
- पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा
- खिडक्या-दरवाज्यांना जाळ्या लावा
- डास प्रतिबंधक क्रीम/औषधांचा वापर करा
- परिसर स्वच्छ ठेवा आणि कचरा साचू देऊ नका

# पावसाळ्यापूर्वी हिंजवडीतील नालेसफाई, रस्ते दुरुस्तीला गती द्या!

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**माहिती तंत्रज्ञान नगरी (आयटी हब) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी आणि लगतच्या गावांमध्ये पावसाळ्यात उद्भवणारी वाहतूक कोंडी व पाणी साचण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरात पावसाळ्यापूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.**



> "पावसाळा सुरू होण्यापूर्वी आयटी पार्क आणि लगतच्या रहिवासी क्षेत्रांतील रस्ते, नाले आणि पावसाळी पाणी व्यवस्थापनाची कामे चोख असणे आवश्यक आहे. नागरिकांना पावसाळ्यात त्रास होऊ नये, यासाठी कामांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन प्रशासनाला सूचना दिल्या आहेत."
>
> - डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.

स्थानिक आमदार शंकर मांडेकर आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह महानगर आयुक्तांनी शनिवारी (२५ एप्रिल) या भागाचा सविस्तर पाहणी दौरा केला. मुळशी तालुक्यातील हिंजवडी, माण, मारुंजी, भूगाव आणि पिरंगुट या पट्ट्यात पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था आणि अपूर्ण नालेसफाईमुळे नागरिकांना दरवर्षी मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर परिसरातील सर्व नैसर्गिक ओढे व नाले अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या सफाईची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश महानगर आयुक्तांनी दिले. विशेषतः 'नांदे चौक' येथील पावसाळी जलवाहिन्यांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) काम प्राधान्याने मार्गी लावण्यास त्यांनी सांगितले.

हिंजवडी आयटी पार्क आणि औद्योगिक वसाहतींमधील वाहनांची मोठी वर्दळ लक्षात घेता, मर्सिडीज शोरूम (राष्ट्रीय महामार्ग ४८) ते हिंजवडी फेज-१ या जोडरस्त्याचा विकास वेगाने करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच लक्ष्मी चौक, कोलते-पाटील रस्ता आणि नेरे-दत्तवाडी-जांबे येथील रस्त्यांचे रुंदीकरण व विकासाचा आढावा घेण्यात आला. 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून सुरू असलेल्या 'प्राईड रोड'च्या कामाची महानगर आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा दर्जा आणि गतीबाबत समाधान व्यक्त केले.

पाहणी दौऱ्यादरम्यान हिंजवडी, माण, मारुंजी, म्हाळुंगे, नांदे, चांदे आणि जांबे या गावांतील स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगर आयुक्तांची भेट घेऊन विविध समस्या मांडल्या. या सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्या तातडीने सोडविण्याची ग्वाही महानगर आयुक्तांनी दिली. या पाहणी दौऱ्यात भोर-राजगड-मुळशीचे आमदार शंकर मांडेकर, 'पीएमआरडीए'चे मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी, अधीक्षक अभियंता प्रशांत पाटील, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिम्मत खराडे, कार्यकारी अभियंता वसंत नाईक, सहमहानगर नियोजनकार सोनाली आहेर, तहसीलदार आशा होळकर, जिल्हा परिषद गटविकास अधिकारी सुधीर भागवत, उपअभियंता श्रीधर फणसे, पोलिस निरीक्षक नितीन अंभोरे, हिंजवडीचे ग्रामसेवक अमोल घोळवे, मुळशी तालुका पंचायत समितीचे सभापती मंदा शेळके, उपअभियंता अमित तिडके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046